विषय -कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत....

सातारा जिल्हा परिषद, सातारा

जा.क्र.आस्था-२(३)/परिपत्रक/कावि/८८४/२०२१

सामान्य प्रशासन विभाग

दिनांक- ०३/०३/ २०२१.

वाचा :- मा. जिल्हादंडाधिकारी सातारा यांचेकडील आदेश क्र.डिसी/एमएजी/२/ एसआर/०८/२०२१ दिनांक - २४/०२/२०२१.

परिपत्रक

या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, मागील काही दिवसांत कोविड -१९ रुग्णांमध्ये लक्षणीय वाढ होत असून कोविड - १९ च्या पार्श्वभूमीवर लावण्यात आलेले बहुतांश निर्बंध हटवण्यात आले असून मोठया प्रमाणात गर्दी होत असल्याचे निदर्शनास येत आहे. कोरोना विषाणूचा (COVID-19) प्रसार जिल्हयातील कार्यालयांमध्ये होवू नये तसेच जिल्हयातील अधिकारी/कर्मचारी यांना त्याचा संसर्ग होवू नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सार्वजनिक वाहतुक व गर्दी कमी करणे आवश्यक आहे. तरी कार्यालयातील दैनंदिन कामकाज करताना खालील सुचनांचे पालन करण्यात यावे.

१. अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती १०० % ठेवताना (COVID-19) अंतर्गत सामाजिक अंतर याबाबत सर्व नियमांचे पालन करण्यात यावे.

२. अधिकारी/कर्मचारी यांनी कार्यालयात व कार्यालयीन आवारात चेह-याचे तोंडावर व नाकावर मास्कचा वापर करणे अनिवार्य आहे.

३. अधिकारी/कर्मचारी यांनी जिल्हा परिषदेमध्ये प्रवेश करताना सॅनिटायझरने हात धुवून स्वत:चे तापमान तपासून प्रवेश करावा.

४. सर्व विभागातील / कर्मचारी यांनी गर्दी कमी करुन कामकाज करण्यात यावे.

५. कोरोना विषाणूचा प्रादुर्भावामुळे कर्मचा-यांचे आरोग्य धोक्यात येवू नये म्हणून अधिकारी/कर्मचारी यांनी चहा-पानासाठी कार्यालयाबाहेर जावू नये. संबंधित सर्व कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत त्यांना सोपविण्यात आलेले कामकाज हे त्यांचेसाठी केलेल्या बैठक व्यवस्थेच्या ठिकाणी उपस्थित राहून करणे आवश्यक असून कर्मचारी यांनी शासकीय कामाव्यतिरिक्त कार्यालयाबाहेर जाण्याचे टाळावे.

६. विभागप्रमुखांना (COVID-19) अंतर्गत काही निदर्शनास आल्यास तात्काळ अधिकारी/कर्मचारी यांना क्वॉरन्टाईन करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

७. सदर परिपत्रक सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणावी.

सदर परिपत्रकाचे उल्लंघन करणारी व्यक्ती (अधिकारी/कर्मचारी) आपती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ तसेच महाराष्ट्र (COVID-19) उपाययोजना नियम २०२० चे नियम ११ नुसार भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) कलम १८८ मधील तरतुदीनुसार दंडनीय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील याची नोंद घ्यावी.

विनय गौडा जी सी (भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद,सातारा

प्रति,

१) सर्व खातेप्रमुख,
सातारा जिल्हा परिषद,सातारा .........

२) गट विकास अधिकारी,
पंचायत समिती सर्व ......................

प्रत:- मा. अध्यक्ष /उपाध्यक्ष , जिल्हा परिषद सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत:- मा. सभापती, विषय समिती, जि.प.सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत:- अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. सातारा यांना माहितीसाठी.

प्रत:- सातारा जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरिता.